॥ राष्ट्रदेवाः भवेम ॥

# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई-प्रशिक्षक


वर्ष २ : अंक १ / ऑक्टोबर २०१४



शुभ दीपावली



मुलांना हेही शिकवावे



दिवाळी सुट्टीचा अभ्यास



मनुष्यघडणीसाठी आवाहन

# संपादकीय

सस्नेह नमस्कार,

दिवाळीच्या सुट्टीपूर्वीचा हा शेवटचा अंक. वर्षभराचा हिशोब केला तर ३६५ दिवसांपैकी विद्यार्थी सर्वसाधारणपणे २२० दिवस शाळेत येतात. या २२० दिवसातले रोज साडे पाच ते सहा तास वर्गातले मानले तर वर्षभरात १२१० तास त्यांचे शाळेच्या वातावरणात शिक्षण होते. वर्षभरात आपल्या वाट्याला निसर्ग नियमाने ८७६० तास येतात. त्यातले २९२० तास झोपेत गेले तरी ५८४० तास जागृतीचे राहतात म्हणजे जागेपणातल्या एकूण वेळापैकी जेमतेम २१% वेळ मुले शाळेत असतात. म्हणजे सुमारे ८०% शाळेबाहेर मग आपण शाळेतल्या शिक्षणाच्या जोडीने शाळेबाहेरच्या वेळातील शिक्षणांचा गांभिर्याने विचार का नाही करत? शाळेतील शिक्षण हे त्याच्या जीवनशिक्षणाला उद्दिपित करणारे मानले तर उरलेल्या वेळात मूल जे अनुभव घेईल ते अधिक अर्थपूर्ण होतील. शाळेत शिकलेल्या तत्त्वांचे, सूत्रांचे उपयोजन आणि जीवनात येत असलेल्या अनुभवांचे शालेय शिक्षणात होणारे आकलन, असा मेळ बसला तर किती छान ! म्हणजे जीवनानुभव प्रधान मानून अभ्यासक्रमाची मांडणी केली पाहिजे. शालेय अभ्यासक्रम आणि अनुभवक्रम हातात हात घालून चालले पाहिजेत. त्यामुळे दिवाळीची सुट्टी किंवा उन्हाळ्याची सुट्टी यांच्याकडे वेगळे, विशेष, व्यामिश्र, जास्त कालावधीचे अनुभव घेण्याची संधी म्हणून बघितले पाहिजे. असे अनुभव कसे घ्यावेत हे सुचविणे, त्यांचे नियोजन करायला विद्यार्थ्यांना मदत करणे, कुटुंबीयांशी या संबंधी बोलणे, आवश्यक असेल तिथे शाळेने अशा अनुभवांची योजना करणे हे सारे शिक्षणव्यवस्थेचे दायित्व मानायला लागेल. तरच आपण शिक्षणाचा परिपूर्ण विचार केला असे होईल.

मोठ्या सुट्टयांमध्ये अनेक अनुभव घेता येतील. या अंकात दिवाळीचा अभ्यास म्हणून एक नमुना लेख दिला आहे. त्यात आपल्याला आणखी भर घालता येईल. मुलांनी दिवाळीत आकाशकंदिल, पणत्यो, सजावटीचे साहित्य तयार करावे, किल्ले बांधावे, प्रतिकृती तयार कराव्यात, रांगोळ्या काढाव्यात, फराळाचे पदार्थ बनवावेत, छोट्या सहली काढाव्यात, पुस्तके वाचावीत, कात्रणसंग्रह तयार करावेत, एक ना अनेक गोष्टींचा दिवाळी अभ्यास आपल्या मुलांना करता येईल. त्यांना तुमची प्रेरणा आणि मदत लागेल. चला या दिवाळीपासून सुरुवात करु या !

ही दीपावली आपणा सगळ्यांना सुखदायी व आरामदायी ठरो हीच प्रार्थना !

प्रा. विवेक पोंक्षे

# मुलांना हेही शिकवावे.........

आपल्या समाजात कधी एखाद्या शिक्षकाचा गौरव होतो. शिक्षकांबद्दल त्यांचे विद्यार्थी सदैव आदराने बोलतात. खरे पाहता हा गौरव कोण्या व्यक्तींचा नसून तो एका परंपरेचा गौरव आहे. शिक्षक असणे ही एक नोकरी किंवा पेशा राहिलेला नसून तो एक धर्म झाला आहे. राष्ट्राच्या भवितव्याच्या ह्या शिल्पकारांना मी नम्र भावाने अभिवादन करतो. मी तुम्हाला काही द्यायला येत नाही. तो अधिकार मला नाही. मी आज तर एक भिक्षुक म्हणून तुमच्या दाराशी आलो आहे. मला माहीत आहे की, जाता येता शिक्षकांना उपदेश करण्याची सध्या फॅशन आहे. जो येतो तो शिक्षकांना उपदेश करतो. मी कोण तुम्हाला उपदेश करणारा? ते पाप मी करणार नाही. मी काही द्यायला आलो नाही. मी भिक्षुक म्हणून आलो आहे. याचक म्हणून आलो आहे.

टॉकीजच्या बाहेर किंवा पंचतारांकित हॉटेलच्या बाहेर एखादा भिकारी कधी तुम्ही पाहिला आहे का? दिसणारच नाही कधी. भिकारी देवळाच्या बाहेर बसतात. कारण त्याला अंदाज असतो की, देवळात येणारी व्यक्ती संवेदनक्षम असते. तिला माझ्यातही परमात्म्याचा अंश दिसेल, आणि त्यामुळे कदाचित मला काही देण्याची इच्छा तिला होईल म्हणून टॉकीज किंवा पंचतारांकितच्या वाटेला न जाता, याचक देवळाच्या आणि दाराशी उभा राहतो. त्याच भावनेने आज मी तुमच्या दाराशी आलो आहे. माझ्या अपेक्षा आणि माझ्या याचना तुम्हीच पुऱ्या करु शकाल! मला आठवतंय, एकदा शासकीय कार्यालयात एक शिक्षक सांगत होते की, आमचा पावलोपावली अपमान होतो, आमची मस्करी होते. 'मास्तर' म्हणून आम्हाला हिणवण्यात येते. 'मास्तर' शब्द कसा निर्माण झाला ते मला माहीत नाही. पण सामान्य माणूस तुमच्या वर्तनात मास्तर म्हणजे मातृत्वाचा स्तर अनुभवत असतो, म्हणून तुम्हाला मास्तर म्हटले जाते. जगातल्या कोणत्याही महापुरुषाचे चरित्र पहा. प्रत्येक महापुरुषाने त्यांच्या त्यांच्या शिक्षकाचा आदराने उल्लेख केलेला असतो. हयापेक्षा मोठी अशी कृतज्ञता कोणती असू शकते?

शिक्षकांनादेखील प्रपंच असतो. मुलाबाळांच्या जबाबदाऱ्या असतात, महागाईला तोंड द्यायचे असते. तेव्हा तुमच्या मागण्या करण्याचा तुम्हाला अधिकार आहेच. लोकशाहीत हा हक्क प्रत्येक घटकाला आहे. शिक्षकाला आकांक्षा जरुर असाव्यात, पण शिक्षकाजवळ स्वप्नेदेखील असावीत. स्वप्नांशिवाय शिक्षक असूच शकत नाही. तुम्हाला एक गोष्ट ठरवावी लागेल की, तुम्हाला कोण व्हायचे आहे? तुमचा आदर्श कोण आहे? तुम्हाला असे वाटते का की, आपण सांदीपनी व्हावे आणि कोण्या कृष्णाला घडवावे. कधी असे वाटते का की, आपण वसिष्ठ किंवा विश्वामित्र व्हावे आणि कोण्या प्रभु रामचंद्राचे व्यक्तिमत्त्व घडवावे? कधी तुम्हाला असे वाटते का की, आपण समर्थ रामदास व्हावे आणि कोण्या शिवरायाला घडवावं? कधी चाणक्य होऊन कोणत्या चंद्रगुप्ताला घडवावं? स्वप्नांशिवाय जीवनाला काही अर्थ नसतो. आकांक्षा असाव्यात, त्याची पूर्तीदेखील अवश्य व्हावी. पण आकांक्षा हीच काही जीवनाची मर्यादा नसते, इतिकर्तव्यता नसते. स्वप्नांचा आणि जीवनाचा संगम होणे फार आवश्यक आहे असे मला वाटते. सॉक्रेटीस नेहमी म्हणायचे, "माझे वडील शिल्पकार होते. मूर्ती घडवायचे ते. आई सुईण होती. उमलत्या जीवाला प्रकाशात आणण्याचे काम ती करायची. आई वडिलांची कामे एकत्रितपणे करावी असे मी ठरवले, म्हणून मी शिक्षक झालो. मी मूर्ती घडवतो देखील आणि तिला प्रकाशातही आणतो." हेच काम असते शिक्षकाचे.

आज भारतात गवताच्या उडवीला आग लागली आहे. अनेकजण ती आग विझवण्यासाठी धडपडत आहेत. कोणी पाणी आणतोय, कोणी आगीवर माती घालतोय, परंतु ह्या आगडोंबात सुज्ञ माणूस वेगळ्या पद्धतीने विचार करील. तो आग विझवण्यासाठी जीव पाखडणार नाही. तो जास्तीत जास्त पेंढ्या तरी वाचवील. आज सर्वत्र आग लागली असताना मी म्हणेन की, प्रथम शिक्षकाला वाचवा, तो समाजाला वाचवेल.

एक चिनी म्हण आहे. आम्ही एकाच वर्षाचा विचार करणार असू तर आम्ही धान्यच पेरु, आमच्या डोळ्यासमोर जर दहा वर्षांचा विचार असेल तर फळझाडे लावू, पण जर आमच्या समोर पिढ्यांचा विचार असेल तर मात्र आम्ही माणसे घडवू, माणसे घडवण्याचे काम शिक्षक करीत असतात. असे अनेक गुरुवर्य असतील की, ज्यांना पुरस्कार मिळाले नाहीत. एखादा पुरस्कार मिळेल अथवा मिळणार नाही, पण माझ्या हाताखालून अक्षरशःहजारो विद्यार्थी शिकून जात असतात. त्यापैकी एखादा तरी विद्यार्थी मी असा घडवीन की, तो पुरस्कार मिळवून आणील. तो माझा खरा पुरस्कार असेल. वर्गात तर मी शिकवेनच पण त्याही पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहून, त्यांच्यावर डोळस मायेची पाखर घालून मी त्यांना घडविण्याचा प्रयत्न करीन. असे चिंतन, असा विचार, असे स्वप्न शिक्षकाने अवश्य बाळगावे. शिक्षकाचे सामर्थ्य परीसापेक्षा देखील मोठे असते. परीसाचा स्पर्श झाला तर लोखंडाचे सोने होते. पण परीसामुळे लोखंडाचा परीस होत नाही म्हणून आता सगळ्या आशा शिक्षकावरच एकवटल्या आहेत.

तुम्ही जेव्हा भूगोल शिकवत असाल, अक्षांश-रेखांश समजावून सांगत असाल. ध्रुव कोठे आहे याचा ऊहापोह जेव्हा होत असेल, तेव्हा हे गुरुवर्यांनो, तुम्ही एक गोष्ट विद्यार्थ्यांना आवर्जून सांगा की, ही पृथ्वी गोल आहे आणि ती गोल आहे म्हणूनच सग्रह आहे. तिच्यात कुठे सांदी कोपरे नाहीत. आणि ती अशी आहे म्हणूनच ती सर्वांना समावून घेऊ शकते. जेव्हा भूगोल शिकवाल तेव्हा भारताची दक्षिणोत्तर विशालता विद्यार्थ्यांना सांगाच, पण आणखी एक गोष्ट न विसरता सांगा की, केरळच्या भूमीवर जन्माला आलेला एक बालक वयाच्या केवळ आठव्या वर्षी आईवडिलांचा आशीर्वाद घेऊन भारतभ्रमणासाठी बाहेर पडला. जुना काळ आहे तो. सोयी नाहीत. जंगले आहेत. हिंस्त्र प्राणी आहेत. जीवाला पावलोपावली भय आहे. हा शिशू केरळमधून निघून केदारनाथला पोचला. त्याने चार धामांची रचना करून अखंड हिंदुस्थानासाठी एक सांस्कृतिक बंध निर्माण केला. भूगोल शिकवत असताना बाल शंकराची ही गोष्ट सांगायला विसरु नका.

आचार्य मित्रांनो, तुम्ही जेव्हा खनिजशास्त्र शिकवीत असाल. कोळसा कोठे निर्माण होतो आणि पेट्रोल कोठे मिळते, हे जेव्हा सांगत असाल, तेव्हा विद्यार्थ्यांना आणखी एक गोष्ट सांगायला विसरु नका. जमिनीतून अगदी खोलातून काढलेल्या दगडावर असंख्य प्रक्रिया करण्यात येतात. त्याला घासण्यात येते. नानाविध प्रक्रिया करुन त्याला पैलू पाडण्यात येतात. तेव्हा भूगर्भातून निघालेला तो दगड हिरा म्हणून मौल्यवान होतो. मुलांना हे देखील सांगा की, सोने जेवढे जळते तेवढे उजळते आणि लोखंड जर तापले तरच त्यातून पोलाद निर्माण होते. हा जीवनधर्म खनिजशास्त्राच्या माध्यमातून सांगा. तुमच्या नजरेसमोर खेळत असलेल्या मुलातूनच एखादा लोहपुरुष निर्माण होईल.

तुम्ही तुमच्या विद्यार्थ्याला स्पष्टपणे सांगा की, बाळा, पश्चिमात्य मंडळी जेव्हा पर्यावरणाची पोपटपंची करतील तेव्हा ते लक्षात घे आणि पश्चिमात्यांच्या नजरेला नजर भिडवून सांग, तुम्ही आम्हाला पर्यावरणशास्त्र शिकवू नका. ते आम्हाला पूर्वजांनी कधीच शिकवलेले आहे. आम्ही नदीला आई मानतो. वृक्षांना देव मानतो. सूर्य-चंद्र आमच्या घरातीलच माणसे आहेत. चंद्राला मामाच्या रुपात फक्त आम्हीच पाहू शकतो. पर्यावरणाचा हा भाव आणि दृष्टीकोन तुम्ही अवश्य विशद करुन सांगा.

तुम्ही जेव्हा रसायनशास्त्र शिकवत असाल तेव्हा सांगा की, एचटूओ ही पाण्याची संरचना आहे हे खरेच आहे, पण ही व्याख्या गंगाजलाची फोड नाही करु शकत. पाण्यापाण्यात फरक असतो. गंगाजल हे गंगाजल असते केवळ पाणी नसते. ही भावना त्यांच्या मनात जागृत होईल असा तुम्ही विशेष प्रयत्न करा. हजारो वर्षांची ही संस्कृती कोणत्या रसायनाने टिकून राहिली आहे, याचाही विचार करा. कोणाची तरी मुलगी आपल्या कुंटुंबात येते, तिचे संस्कार वेगळे असतात, तिचे संगोपन वेगळ्या वातावरणात झालले असते. अनेक सवयी वेगळ्या असतात. पण असे असूनही ती आपल्या कुटुंबाचे एक अभिन्न अंग होऊन जाते. ही कुटुंबव्यवस्था चालते त्यामगचे रसायन शास्त्र कोणते आहे याचाही अभ्यास होऊ दे. त्या रसायनशास्त्राने हया संस्क़ृतीला हजारो वर्षापासून चैतन्याने मुसमुसत ठेवले आहे. समाजाला समर्थ करायचे असेल तर त्या रसायनशास्त्राला पर्यायच नाही. त्याचाही अभ्यास होऊ दे.

नागरिकशास्त्र शिकवताना मूलभूत हक्काप्रमाणे मूलभूत कर्तव्यांची जाणीवदेखील निर्माण करा. मला काय त्याचे, मला काय मिळेल? याच आरोळ्या जगात सर्वत्र उठत असताना एक गोष्ट विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवा की, मूलभूत कर्तव्य हाच माझा मूलभूत हक्क आहे. आपण आपल्या कर्तव्याचे पालन केले तर दुसऱ्यांच्या अधिकाराचे पालन आपोआपच होते. प्रत्येकाने जर आपल्या कर्तव्याचे पालन केले तर मूलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी आटापिटा करावाच लागणार नाही, परंतु कर्तव्यांच्या पायावर उभा राहील, असे नागरिकशास्त्र तुम्ही विद्यार्थ्यांच्या मनात रुजवा.

समाजशास्त्र शिकवताना अनेक प्रश्नांची उकल कराच, पण एक मोठे सत्य मुलांना आवर्जून सांगा. या देशात उच्चनीच भाव सर्वथा त्याज्य आहे. प्रभू रामचंद्र महत्त्वाचे आहेतच. पूजनीय आहेतच पण वानरसेनादेखील तिकीच महत्त्वाची आहे. एका सांस्कृतिक विजययात्रेचा पाया प्रभू रामचंद्रांनी घातला. समाजशास्त्र शिकवत असताना आणखी एक गोष्ट सांगा की, गोवर्धन उचलणे भगवान श्रीकृष्णांना सहज शक्य होते पण त्यांनी तो नाही उचलला. असंख्य गोपाळांनी त्यांच्या काठ्या उभारल्या तेव्हाच तो पर्वत उचलला गेला. प्रत्येक गोपाळाच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला की, माझ्या काठीमुळेच गोवर्धन उचलला गेला. आपण सर्वांनी तो पेलला आहे. हे समाजशास्त्र होते श्रीकृष्णाचे.

समाजातल्या शेवटच्या स्तरातली होती शबरी. मला असे वाटते की, आता रामाची शबरीभक्ती आपण विद्यार्थ्यांना समजावून सांगायला हवी. राम आपणहून शबरीकडे गेले. त्या भक्तवत्सलाला माहीत होते की शबरीची बोरे उष्टी आहेत, पण शबरीभक्त रामाने ती स्वतः भक्षण केली आणि ते संतोष पावले. उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य असा कोणताही विकल्प मनात न आणता प्रभू रामचंद्रांनी एक आगळे समाजशास्त्र निर्माण केले. प्रगती आणि विकासाच्या चर्चा होतीलच. त्या झाल्याच पाहिजेत. त्या आवश्यकदेखील आहेत. माझ्या घरात सायकल आहे. शेजारी स्कूटर येते. माझ्या मनात ईर्ष्या निर्माण होते. अँबीशनची ठिणगी पडते. अनेकांचे म्हणणे आहे की, अँबीशनशिवाय आयुष्यच नसते. पण जीवनात अँबीशनपेक्षा मिशन असावे. मिशन असेल तर अँबीशन सहजपणे प्राप्त होईल. जीवनाला विकासाची आस लावा. स्पर्धेची चटक लावू नका. सर्वत्र निराशाच आहे. मनुष्य प्रत्येक वळणावर प्रत्येक टप्प्यावर निराश होतो आहे. हताश माणसाच्या मनात एकच भय आहे की, सगळे काही वाहून जाते आहे. सगळेच चोर आहेत. सगळेच भ्रष्ट आहेत.

राष्ट्र विनाशाच्या खाईवर येऊन उभे आहे. निराशेच्या ह्या वातावरणातदेखील विद्यार्थ्यांच्या मनात अशेचा दीप प्रज्वलित ठेवण्याची अवघड जबाबदारी तुम्हाला पार पाडायची आहे. मी आपल्याला साकडे घालतो की, भारताच्या या भावी पिढ्यांच्या मनात निराशेचा ध्वनी निर्माण होणारच नाही याची जबाबदारी तुम्ही घ्यायची आहे. मुलांच्या मनावर निराशेचे सावट येणार नाही हे पाहणे, हे तुमचे कर्तव्य आहे.

माहितीक्षेत्राचे युग आहे हे. प्रसारमाध्यमांच्या लाटा सर्वत्र उसळत आहेत. अनेक गोष्टी आपल्या कानावर सतत आदळत असतात. कोणाचेही मन विचलित होणे अगदी सहज शक्य आहे. ह्या प्रचारयुगात तुमचा विद्यार्थी प्रवेश करीत आहे. त्याला सांगा. एक ब्राह्मण वासरू घेऊन जात होता. समोरुन चार ठग आले. त्यांनी मानसिक ताण व गोंधळ निर्माण केला आणि त्या ब्राह्मणाला वाटू लागले की त्याच्याजवळील वासरु हे वासरु नसून कुत्रा आहे. त्याने त्या वासराला टाकून दिले. प्रचाराच्या या भ्रम जालात सत्याचा सातत्याने विचार करण्याची क्षमता तुम्ही मुलांच्या मनात निर्माण करा.

हे आचार्यांनो, गणित शिकवत असताना गुणांचा गुणाकार करण्याची सवय मुलांना लावा. तोच जीवन प्रशस्त करण्याचा एकमेव मार्ग असतो. एक अधिक एक बरोबर दोन हे तर खरे आहेच, पण एक जर एकाच्या बाजूला येऊन उभा राहिला तर अकरा होतात. दुसऱ्याचे अस्तित्व स्वीकारणे, ते मान्य करणे आणि त्याच्या बरोबरीन उभे राहणे हाच वैभवाचा मार्ग असतो. एकाने जर दुसऱ्या एकाला गिळून टाकले तर ती वजाबाकी होईल, हे गणितदेखील विद्यार्थ्यांना शिकवा.

चित्रकला ही रंगांची संगती असते. मुलांना हे पण सांगा की, जीवनातदेखील संगती असली पाहिजे, मॅचिंग असले पाहिजे. एका बाजूला गगनचुंबी इमारती आहेत, तर दुसऱ्या बाजूला भीषण झोपडपट्ट्या आहेत. एका बाजूला अपार धन आहे, तर दुसऱ्या बाजूला फक्त अभावच आहे. चित्रकलेप्रमाणे जीवनातदेखील रंगसंगती निर्माण करायची आहे, याचे भान मुलांच्या मनात निर्माण करा. रावणवध, कंसवध हया कथा सांगाच पण त्याच बरोबरीने लक्ष्मणरेषेचे महत्त्व देखील मुलांना समजावून सांगा. जीवनशास्त्राच्या तासाला अमिबाची शरीररचना शिकवाच पण जाळे बांधणाऱ्या, त्या प्रयत्नात वारंवार पडणाऱ्या पण धीर न सोडणाऱ्या कोळ्याचीही गोष्ट न विसरता सांगा. एक फूल देवाला म्हणते, नववधूच्या शृंगारासाठी माझा उपयोग नाही झाला तरी चालेल, राजामहाराजांच्या गळ्यात मला स्थान नाही मिळाले तरी चालेल, कोण्या देवाच्या चरणी जरी मी वाहिला नाही गेलो तरी चालेल. देवा तू एकच कर, ज्या मार्गावरुन ह्या धरतीच्या शूरवीरांची सेना जात असेल, त्या मार्गावर मला भिरकावून दे. त्या सेनेच्या पावलांनी तुडवले जाण्यातच माझ्या जीवनाची सार्थकता आहे. एकविसाव्या शतकातील नवी पिढी कशी असेल ते ठरविण्याची निर्णायक भूमिका निश्चित करण्याची अमूल्य संधी आपणास प्राप्त झाली आहे. ह्या राष्ट्रयज्ञात आहुती अर्पण करण्याची भूमिका आपल्याला वठवायची आहे. दधिचीच्या परंपरेत आपण निर्माण झालो आहोत. आपण विद्यादान करणार आहोत. हे करीत असताना आपण आपली स्वप्ने तर जपणार आहोतच, पण आपल्यावर ज्यांची जबाबदारी आहे अशा विद्यार्थ्यांची स्वप्नेदेखील आपण जपणार आहोत!

अहमदाबाद येथील गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात भारताचे सध्याचे पंतप्रधान मा. नरेंद्रभाई मोदी यांनी गेल्या वर्षी शिक्षकदिनानिमित्त केलेले भाषण.

(आपले जग ९ जून २०१४ मधून साभार पुर्नमुद्रित)

दिवाळीत शालेय अभ्यासाला पूरक व विद्यार्थांचा दिवाळीच्या तयारीतील सहभाग वाढावा या साठी महात्मा गांधी विद्यामंदिर बांद्रा यांनी पुढील कृतीअभ्यास निश्चित केला आहे. असा आनंददायी अभ्यासकार्य असलेला दिवाळी अभ्यास नक्की द्या. या अभ्यासकार्याद्वारे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन करता येऊ शकेल.

महात्मा गांधी विद्यामंदिर

स्वामी विवेकानंद गुरुकुल

## दिवाळी सुट्टीचा अभ्यास २०१३-१४

इयत्ता ५ वी ते १० वी दिनांक २५/१०/२०१३

१) खालील साहित्याचे बाजारभाव काढा. प्रत्येकी एक किलो - बेसनाचे लाडू, चिवडा, चकली, शंकरपाळी

२) तुमच्या घरी फराळ करण्यासाठी किती खर्च आला? तयार फराळ आणि घरगुती फराळ यांना आलेला खर्च यात काय फरक जाणवला ते लिहा.

३) 'दिवाळी तुमची दिवाळी आमची व सजावट चीनची' यावर तुमचे मत व्यक्त करा/निबंध लिहा.

४) घरी पारंपरिक/ठिपक्यांची रांगोळी काढा. तुमच्या विभागातील तसेच तुम्ही स्वतः काढलेल्या रांगोळीचे फोटो काढा व ते शाळेत सादर करा.

५) फटाक्यावरील माहितीचे संकलन करा. उदा. १) फटाक्याचे नाव २) उत्पादक ३) आवाजक्षमता

६) शोभेच्या फटाक्यात कोणते रासायनिक घटक आहेत ते लिहा व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम लिहा.

७) दिवाळी शुभेच्छापत्र तयार करुन त्यावर मराठी/इंग्रजी/संस्कृत संदेश लिहून ते शुभेच्छापत्र शिक्षक/नातेवाईक यांना पाठवा.

८) स्वंयंपाकघरात स्वंयंपाकाशी संबंधित क्रियापदे लिहिणे (इ.५ वी साठी), इ.६ वी क्रियापद लिहून त्याची वाक्ये बनवा. उदा. तळणे, इ.७ वी/८ वी क्रियापदांना पर्यायी इंग्रजी शब्द लिहा.

९) एका फराळाची साहित्य कृती मराठी/इंग्रजी भाषेत लिहा.

१०) दिवाळी कशी साजरी केली ते मित्राला/मैत्रिणीला कळवा.

११) दिवाळीसाठी स्वतः आकाशकंदिल तयार करा.








# पुस्तक परिचय

## मनुष्यघडणीसाठी आवाहन खंड १




**प्रस्तावना**

'मनुष्यघडणीसाठी आवाहन' या पुस्तकाचे लेखक डॉ. गिरीश बापट यांनी विविध प्रसंगांच्या निमित्ताने दिलेली व्याख्याने आणि लिहिलेले लेख यांचा संग्रह या पुस्तकात आहे. हे सर्व लेख प्रामुख्याने ज्ञान प्रबोधिनीमध्ये आत्तापर्यंत आयोजित केलेल्या आणि सुरू असलेल्या कार्यक्रमांवर आधारित आहेत. या पार्श्वभूमीवर माझा ज्ञान प्रबोधिनीशी कधी आणि कसा संबंध आला हे थोडक्यात स्पष्ट करणे मला आवश्यक वाटते.

ज्ञान प्रबोधिनीबद्दल मला पहिल्यांदा माहिती झाली ती जून १९७३मध्ये. बुद्धिमान मुलांसाठीची शाळा, प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेला विकासाची आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी चळवळ आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांना मूर्त रूप देणारी कै. अप्पा पेंडसे यांनी स्थापन केलेली संस्था म्हणून तिची ओळख झाली. १९७२मध्ये रसायनशास्त्रात एम. एस्सी. होताच माझी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागात नेमणूक झाली होती. एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर नगरला जिल्हा शिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती मिळाली. या प्रशिक्षणाचा भाग म्हणून काही निवडक चांगल्या शैक्षणिक संस्थांना भेटी होत्या; त्याचा एक भाग म्हणून ज्ञान प्रबोधिनीलाही भेट होती. विद्यार्थी म्हणून माझे शिक्षण चौथीपर्यंत नगरपालिकेच्या, तर नंतर अकरावीपर्यंत सरकारी शाळेत झाले होते. या दोन्ही शाळांमध्ये मला वैविध्यपूर्ण असे वातावरण मिळाले हा मोठा फायदा असला तरी कोणत्याही विशिष्ट प्रकारची तात्त्विक बैठक तयार करण्याच्या दृष्टीने या शाळांमध्ये प्रयत्न व्हायचे नाहीत. विद्यार्थी प्रामुख्याने आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या कमकुवत घटकांतलेच असायचे. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे निकालही यथातथाच लागायचे. अनेक मुले त्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघात किंवा राष्ट्र सेवा दलात जायची. माझा मात्र शालेय, महाविद्यालयीन जीवनात किंवा त्यानंतरही अशा कोणत्याच संघटनेशी किंवा चळवळीशी संबंध आला नव्हता. जुलै १९७३मध्ये प्रशिक्षण संपवून कामाला सुरुवात केली आणि ज्ञान प्रबोधिनी हा विषय माझ्या डोक्यातून पूर्णपणे बाहेर पडला. १९८५ ते १९९२ या कालावधीत मी मुंबईला मंत्रालयात शालेय शिक्षण विभागात उपसचिव म्हणून काम करत होतो. त्या काळात महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री प्रा. सदानंद वर्दे हे ज्या ज्या वेळी मंत्रालयात यायचे त्या त्या वेळी माझ्याकडे थोडा वेळ डोकावून जायचे. प्रा. सदानंद वर्दे हे राजकारणातील एक ज्येष्ठ, सुसंस्कृत, अभ्यासू आणि निगर्वी असे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या प्रत्येक भेटीत ते इतर अनेक विषयांबरोबरच ज्ञान प्रबोधिनीबाबत कौतुकाने बोलायचे. ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यक्रमांत हिंदुत्व हा प्रमुख आधार असतो हा एक समज मोठ्या प्रमाणावर प्रचलित होता आणि आजही प्रचलित आहे. बहुतेक समाजवादी लोकांमध्ये हिंदुत्वाशी निगडित अशा संस्थांबद्दल चांगले बोलणे म्हणजे एखादा गुन्हाच अशी भावना असते. असे असूनही प्रा. सदानंद वर्दे यांना ज्ञान प्रबोधिनीबद्दल एवढे कौतुक का वाटते याचे मला नेहमीच आश्चर्य वाटायचे. याच कालावधीत – १९९१ मध्ये – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या 'शिक्षण संक्रमण' या मासिकात 'शालेय प्रशासन आणि मानवी संबंध' या विषयावर माझी एक लेखमाला सुरू झाली. ती वाचून एकदा डॉ. गिरीश बापट यांचा मला दूरध्वनी आला. त्यांना ही लेखमाला खूपच आवडली होती. त्यांच्या निमंत्रणावरून मी पुणे येथील ज्ञान प्रबोधिनीला भेट दिली आणि त्यांच्याकडून ज्ञान प्रबोधिनीमार्फत सुरू असलेले वेगवेगळे कार्यक्रम समजावून घेतले. त्यानंतर निगडी आणि सोलापूर येथील ज्ञान प्रबोधिनीच्या शाळांना भेटी देण्याचा योग आला. ज्ञान प्रबोधिनीत शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांशी, ज्ञान प्रबोधिनीतून शिक्षण पूर्ण केलेल्या आणि नंतर विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांशी आणि ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांशी झालेल्या चर्चांमधून ज्ञान प्रबोधिनीचे कार्यक्रम आणखी चांगल्या प्रकारे समजले. १९९५मध्ये मी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचा संचालक म्हणून काम करत असताना परिषदेच्या शिक्षकांसाठी प्रकाशित होणाऱ्या 'जीवन शिक्षण' या मासिकाचा 'वाचनकौशल्य विशेषांक' काढला होता.

या अंकाचे उत्स्फूर्त स्वागत झाले. ज्ञान प्रबोधिनीने या विशेषांकाचे अतिथी संपादक म्हणून जबाबदारी सांभाळली होती. त्यानंतर शिक्षण हक्क कायदा लागू होण्यापूर्वी शालाबाह्य मुलांसाठी सुरू असलेल्या साखर शाळांच्या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनीचा आणखी चांगल्या प्रकारे परिचय झाला.

ज्ञान प्रबोधिनीने एक संस्था म्हणून केलेले काम शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांत काम करणाऱ्या इतर अनेक नावाजलेल्या संस्थांपेक्षा उठून दिसणारे आहे. संवेदनशीलता, समग्रता, सहविचार आणि स्वावलंबन ही संस्थेच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये ज्ञान प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांच्या कार्यशैलीतही दिसूनही येतात. समाजाभिमुखता, राष्ट्रप्रेम आणि भारतीय संस्कृतीबद्दलचे प्रेम या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांबरोबरच कोणत्याही धर्म, जाती, प्रांत आणि भाषा यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या वादांच्या पलीकडे असणे हेसुद्धा वैशिष्ट्य त्यांच्यामध्ये आढळते. व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण, सांघिक कार्य, प्रत्यक्ष व्यवहाराशी आणि जीवनाशी सांगड घालणारे प्रकल्प ही ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यक्रमाची वैशिष्ट्ये केवळ पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतच नाहीत, तर निगडी आणि सोलापूर येथील शाळांमध्येसुद्धा मला दिसून आली.

शिक्षण माणूस घडवणारे असावे असे स्वामी विवेकानंद म्हणायचे. ज्यामुळे समाज स्वावलंबी, निर्भय वृत्तीचा आणि साहसी बनेल असे शिक्षण माणूस घडवणारे असावे असे स्वामी विवेकानंद म्हणायचे. ज्यामुळे समाज स्वावलंबी, निर्भय वृत्तीचा आणि साहसी बनेल असे शिक्षण त्यांना अभिप्रेत होते. याच आदर्शांवर चालणाऱ्या या शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. गिरीश बापट यांनी लिहिलेले 'मनुष्यघडणीसाठी आवाहन' हे पुस्तक भारतीय शिक्षणपद्धतीवर असले तरी हाच विषय घेऊन इतर लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांपेक्षा खूपच वेगळे आहे. या विषयावरील इतर पुस्तके प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीचा इतिहास सांगणारी, तिचा गौरव करणारी असतात. पण मेकॉलेने सुरू केलेली कारकून बनवणारी शिक्षणपद्धती आजही सुरू असल्यामुळे शिक्षणविषयक घसरण झाली एवढे विधान करून ही पुस्तके थांबतात. आजच्या काळात भारतीय समाजाला पुढे नेणारी, त्याची प्रगती करणारी शिक्षण व्यवस्था कशी असावी याबद्दल अशा पुस्तकांत मुळीच विश्लेषण नसते. डॉ. गिरीश बापट यांचे प्रस्तुत पुस्तक मात्र याला पूर्णपणे अपवाद आहे. सद्यःस्थितीचे निदान करून भारतीय समाजासाठी कोणत्या प्रकारची शिक्षणपद्धती असावी याबद्दलचे स्पष्ट दिग्दर्शन या पुस्तकात आहे. या पुस्तकात मांडलेल्या विचारांचा, चिंतनाचा आधार प्रामुख्याने डॉ. गिरीश बापट यांनी पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत शिकताना, शिकवताना आणि गेल्या चोवीस वर्षांत ज्ञान प्रबोधिनीचे संचालक या नात्याने जबाबदारी सांभाळताना घेतलेले अनुभव तर आहेतच; परंतु त्याबरोबरच त्यांनी भारतात आणि परदेशात शिक्षण संस्थांना दिलेल्या भेटी, विविध शैक्षणिक परिषदांमध्ये घेतलेला सहभाग, समाजनिरीक्षण, वाचन, चिंतन यांचाही मोठा वाटा आहे. या पुस्तकातील २४ लेखांची विभागणी वाचकांच्या सोयीसाठी 'मूल्यशिक्षण', 'शिक्षणातून व्यक्तिमत्त्व विकास', 'समाजाभिमुख शिक्षण', 'शैक्षणिक तंत्रज्ञान', 'शिक्षणात पालकांचा सहभाग', 'शिक्षणविषयक चिंतन' आणि 'शिक्षण – आज आणि उद्या' अशा सात विभागांत केली असली तरी सर्वच लेखांतील आशय परस्पर–व्याप्त आहे आणि तो तसा असणे अटळही आहे.

या पुस्तकात मांडलेले विचार, संकल्पना आणि कार्यक्रम यांचे इतर शाळांना किती प्रमाणात अनुसरण करता येईल यावर या पुस्तकाची उपयुक्तता ठरणार आहे. हे विचार, संकल्पना आणि कार्यक्रम भारतीय संविधानाला धरून असतील आणि राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर ठरलेल्या शैक्षणिक धोरणांशी सुसंगत असतील तरच त्यांचा इतर शाळांमध्ये विस्तार करणे शक्य आहे. अभ्यासक्रम कसा असावा याची वैशिष्ट्ये शिक्षण हक्क कायद्यात पुढीलप्रमाणे स्पष्ट आणि मोजक्या शब्दांत दिली आहेत – 'संविधानातील मूल्यांशी सुसंगत असणारा, मुलांचा सर्वांगीण विकास साधणारा, त्यांचे ज्ञान, क्षमता आणि प्रज्ञा यांचा विकास करणारा, शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक क्षमतांचा विकास करणारा, कृतिशीलता, चौकसपणा, शोधक वृत्ती यांच्या माध्यमातून बालसुलभ आणि बालकेंद्रित पद्धतीने शिक्षण देणारा, मुलांना भीती आणि मानसिक आघात यांच्यापासून मुक्त करणारा, स्वतःची मते मोकळेपणाने व्यक्त करण्यास मदत करणारा, मुलांचे ज्ञान, आकलन आणि त्यांचा वापर करण्याची क्षमता यांचे सातत्यपूर्ण आणि सर्वंकष मूल्यमापन करणारा असावा.' याबरोबरच जागतिक आरोग्य संघटनेने विहित केलेल्या 'स्व'ची जाणीव, समानुभूती, समस्या निराकरण, निर्णयक्षमता, परिणामकारक संवादकौशल्य, व्यक्ती–व्यक्तींमधील सहसंबंध, सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, भावनांचे समायोजन, ताणतणावांचे समायोजन या दहा जीवनकौशल्यांचाही समावेश शालेय अभ्यासक्रमात जाणीवपूर्वक करायला हवा. या सर्व बाबींशी ज्ञान प्रबोधिनीचे कार्यक्रम सुसंगत तर आहेतच, पण त्याबरोबरच या बाबींना बाधा न आणता विद्यार्थी आणि शिक्षक यांना त्यापेक्षा कितीतरी पुढे नेऊ शकतील असे आहेत असे हे पुस्तक वाचताना लक्षात येते.

विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रुजवणे ही अतिशय कठीण आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यामुळेच अनेक शाळा एक तर या क्षेत्रात अतिशय जुजबी स्वरूपाचे काम करतात किंवा त्याकडे दुर्लक्ष करतात. परंतु व्यक्तिमत्त्व विकास आणि मूल्यशिक्षण ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याचा गाभाच आहे असे दिसून येते. डॉ. गिरीश बापट त्याला 'वृत्तिघडण' म्हणतात. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या २०१२मध्ये प्रकाशित केलेल्या मूल्यशिक्षणाच्या आराखड्यात 'मूल्यशिक्षण हा शालेय अभ्यासक्रमाचाच अविभाज्य भाग असावा आणि शाळा, पालक व स्थानिक समाज यांनी एकत्र येऊनच मूल्यशिक्षणाचे कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी करावी' असे म्हटले आहे. भारतीय संविधानात दिलेली न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही चार शाश्वत मूल्ये आणि संविधानातच ५१(क) या कलमात दिलेली नागरिकांची कर्तव्ये हाच मूल्यशिक्षणाचा प्रमुख आधार असला पाहिजे. जाती–धर्म–भाषा–प्रांत यांच्या पलीकडे जाऊन आपली बहुविध संस्कृती जपणे आणि वृद्धिंगत करणे, स्त्री–पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण आणि हिंसाचाराचा

निग्रहपूर्वक त्याग, वैयक्तिक आणि सामुदायिक प्रयत्नांतून प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टतेचा ध्यास धरून राष्ट्राची प्रगती सातत्याने होत राहील हे पाहणे ही नागरिकांची कर्तव्ये शाळेपासूनच मुलांच्या मनावर बिंबवली पाहिजेत. मूल्ये पुस्तके वाचून निर्माण होत नाहीत. समाजात वावरताना जागतिक आणि देशपातळीवरच्या संदर्भात वावरताना, काम करताना ती निर्माण होतात. मूल्यशिक्षण हा परीक्षेत उत्तरे लिहून उत्तीर्ण होण्याचा विषय नाही, भाषणांचा विषय नाही; तर प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा विषय आहे याचे भान सातत्याने बाळगावे लागते. संविधानात्मक मूल्यांना आजच्या अभ्यासक्रमातही महत्त्व आहे, परंतु त्यांना बाधा येत नाही ना हे कटाक्षाने पाहण्यापुरतेच ते मर्यादित झालेले दिसते. या मूल्यांच्या संदर्भात विद्यार्थ्यांना कृतिप्रवण बनवणारे शिक्षण दिले जाणे गरजेचे आहे. ज्ञान प्रबोधिनीमध्ये सुरू असलेले मूल्यशिक्षणाचे कार्यक्रम कोणत्याही शाळेने अनुसरण करावेत असेच आहेत. मूल्यशिक्षणात 'अनुभव-सवय-वृत्ती-मूल्य' या साखळीनुसार, तर समाजाभिमुखता निर्माण करण्यासाठी 'माहिती-परिचय-नाते-आपलेपणा' या साखळीनुसार ज्ञान प्रबोधिनीचे कार्यक्रम आखलेले असतात. इतर धर्म-पंथांकडे पाहताना उदार दृष्टिकोन कसा तयार होईल याचेसुद्धा या पुस्तकात मार्गदर्शन मिळते. मूल्यशिक्षणासाठी शिक्षकांमध्ये ध्येयवाद, व्यक्तिमत्त्व आणि अध्यापन तंत्र या तिन्ही दृष्टींनी परिपूर्णता असली पाहिजे. मूल्यशिक्षणात वेळापत्रक, कार्यक्रम, यंत्रणा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या सर्वांच्या बाबतीत लवचिकता किती महत्त्वाची आहे हेसुद्धा पुस्तकात अधोरेखित केले आहे.

शालेय स्तरावर अभ्यासक्रमाची निर्मिती करताना (विशेषतः विज्ञान, गणित आणि सामाजिक शास्त्रे या विषयांच्या बाबतीत) वापरण्यात येणारे संदर्भग्रंथ अनेकदा पाश्चिमात्य असतात. त्यामुळे त्या ग्रंथांमध्ये त्या त्या विषयांची मांडणी युरोपियन, ब्रिटिश किंवा अमेरिकन संदर्भात केलेली असते. त्यावरून विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानविषयक परंपरांचे आणि त्यांतील चढउतारांचे यथार्थ दर्शन होत नाही. शालेय स्तरापासूनच या सर्व विषयांच्या मांडणीत भारतीय परंपरा काय होत्या, त्या कशा समृद्ध झाल्या, केव्हा व का खंडित झाल्या (अथवा झाल्या नाहीत), त्यांतील अभ्यासण्याजोगा भाग कोणता याचे वस्तुनिष्ठ भान विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असे महाराष्ट्राच्या २०१०च्या अभ्यासक्रम आराखड्यात म्हटले आहे. अर्थात आधुनिक विज्ञान, जागतिक इतिहास इत्यादींविषयी विवेचन करताना पाश्चात्त्य किंवा जागतिक संदर्भानेही मांडणी करावी लागेल हे उघड आहे. गणिताच्या बाबतीत प्राचीन काळातील भारताचे योगदान खूपच मोलाचे आहे. परंतु त्याची माहिती आपल्या अभ्यासक्रमात दिली जात नाही. डॉ. गिरीश बापट यांनी प्रस्तुत पुस्तकात अगदी उपनिषदांपासून भारतीय शिक्षणपद्धतीचे विवेचन केले असून आज त्यातील कोणता भाग कशा रीतीने लागू पडतो तेही स्पष्ट केले आहे. तसेच इतर देशांपासून आपल्याला काय शिकता येईल याचेही विवेचन केले आहे. उदाहरणार्थ व्यक्तिमत्त्व विकासात तैत्तिरीय उपनिषदात सांगितलेला पंचकोश विचार आजही कसा लागू पडतो आणि ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यक्रमांत त्याचा कसा उपयोग केला आहे हे अनेक ठिकाणी सांगितले आहे. पंचकोश विचार आणि १९४३मध्ये अमेरिकन मानसशास्त्रज्ञ अब्राहम मास्लो यांनी मांडलेला 'गरजांचा सोपान' (Theory of Hierarchy of Needs) हा मानवी कार्यप्रेरणेविषयीचा सिद्धांत यांच्यात कमालीचे साम्य आहे हे नमूद करावेसे वाटते. ज्ञान प्रबोधिनीचे व्रत संस्कार हे भारतीय संस्कृतीतून आजच्या काळातही स्वीकारता येईल असे आणखी एक वैशिष्ट्य. अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्याबद्दल पुस्तकात विस्ताराने विवेचन आहे. या पुस्तकात विवेचन केलेल्या गणित, भाषा, कला आणि विज्ञान व तंत्रज्ञान शिकवताना हॉलंड, जपान आणि अमेरिका या देशांत सुरू असलेल्या पद्धती निश्चितपणे आपण स्वीकाराव्या अशाच आहेत.

श्रमप्रतिष्ठा हे रुजवणूक करायला अतिशय कठीण असे मूल्य आहे. अंगमेहनतीची कामे करणाऱ्यांना बौद्धिक कामे करणाऱ्यांएवढी प्रतिष्ठा जगात कुठेच नसते हे एक कटू वास्तव आहे. या पार्श्वभूमीवर श्रमप्रतिष्ठेचे मूल्य कसे रुजवायचे हे आपल्यापुढे एक मोठेच आव्हान आहे. ज्ञान प्रबोधिनीमध्ये समाजाभिमुखता निर्माण करण्यासाठी आखलेले विविध उपक्रम आणि प्रकल्प यांच्या माध्यमातून श्रमप्रतिष्ठेचे मूल्य साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. आपल्याकडे लोकसंख्यावाढीचा वेग जास्त, पण उपलब्ध रोजगारांसाठी मात्र आवश्यक असलेल्या कौशल्यांचा अभाव अशी परिस्थिती आहे. आपले अभ्यासक्रम उत्पादक कौशल्यांशी निगडित नसतील; रोजगारक्षम नसलेल्या शिक्षित व्यक्तींचाच लोकसंख्येत भरणा असेल तर भारत एक महासत्ता बनण्याचे स्वप्न साकार होणे तर दूरच; उलट अराजकाची परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही हे भाकीत वर्तवण्यासाठी कोण्या तज्ज्ञाची आवश्यकता नाही. मूल्यशिक्षण आणि शिक्षणाची अर्थार्जनातील भूमिका या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत याचा विसर पडू देऊन चालणार नाही. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवर व्यवसाय शिक्षणाचा प्रयोग आपल्याकडे फारसा यशस्वी झाला नाही. ज्ञान प्रबोधिनीने याबाबत केलेल्या, विशेषतः खेड-शिवापूर येथे सुरू असलेल्या प्रयोगांबद्दलची माहिती पुस्तकात देत असतानाच पाबळच्या विज्ञानाश्रमात डॉ. कलबाग यांनी सुरू केलेला प्रयोग अधिक पद्धतशीर असल्याचे प्रतिपादन करण्याचा उदारपणा डॉ. गिरीश बापट यांच्याकडे आहे. माध्यमिक स्तरावर जर्मनीची 'सँडविच पद्धती' भारताने का स्वीकारायला पाहिजे याचे अतिशय चांगले विवेचन त्यांनी केले आहे.

सध्या २००५च्या राष्ट्रीय अभ्यासक्रमानुसार देशभर शालेय स्तरावर पुनर्रचित अभ्यासक्रमांची अंमलबजावणी सुरू आहे. पुनर्रचित अभ्यासक्रमात ज्ञानरचनावादाचा बराच बोलबाला आहे. परंतु हे पुस्तक वाचले असता ज्ञान प्रबोधिनीत अगदी सुरवातीपासूनच अभ्यासक्रमाची ज्ञानरचनावादावर आधारित अंमलबजावणी सुरू असल्याचे दिसून येते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या म्हणण्याला कानही द्यावा लागतो आणि वेळही द्यावा लागतो. प्रयत्न मात्र विद्यार्थ्यांचेच असावे लागतात हे ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यक्रमांचे सूत्र आहे. विद्यार्थ्यांचा

अभ्यास, शिक्षक प्रशिक्षण, अध्यापन पद्धती यांबाबत या पुस्तकात दिलेले प्रयोग आणि संकल्पना अभिनव अशाच आहेत. मुलांचा शारीरिक, बौद्धिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकास या चारही गोष्टी एकमेकांत गुंफलेल्या असतात, त्यामुळे त्यांचा एकत्रित आणि साकल्यानेच विचार करणे इष्ट ठरते. तसा तो ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यक्रमांमध्ये केलेला आहे. महाराष्ट्रात गेल्या पंचवीस-तीस वर्षांपासून प्रयोगशील म्हणून सुरू असलेल्या शाळांमध्ये आणि ज्ञान प्रबोधिनीमध्ये सुरू असलेल्या कार्यक्रमांत एक महत्त्वाचा फरक जाणवतो तो म्हणजे 'प्रयोगशील' शाळांमध्ये दिले जाणारे अनुभव विद्यार्थी काठावर उभे राहून अतिसुरक्षित अशा वातावरणात घेतात, तर ज्ञान प्रबोधिनीत विद्यार्थी वास्तव आणि स्पर्धात्मक सामाजिक वातावरणात अनुभव घेतात. हे अनुभव घेत असताना प्रत्यक्ष जीवनात जिच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही अशी नकार, अपयश पचवण्याची क्षमतासुद्धा त्यांच्यात विकसित होते. शालेय सहली आयोजित करणे, राखी विक्री, फटाके विक्री, व्यापाऱ्यांशी स्पर्धा करत दुकान चालवणे इथपासून मरणभान देणारे मृतांचे अंत्यसंस्कार इथपर्यंत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अनुभवांचा आवाका आहे. आपल्या आर्थिक-सामाजिक-राजकीय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर ज्ञान प्रबोधिनीमध्ये सांघिक वृत्तीला प्रोत्साहन देणारे प्रकल्प, कार्यक्रम आयोजित केले जातात हे विशेष. अनेक शिक्षणतज्ज्ञ स्पर्धेकडे एक अनिष्ट बाब म्हणून पाहतात; परंतु ज्ञान प्रबोधिनीचा स्पर्धेकडे पाहण्याचा दृष्टिकोन अभिनव असाच आहे.

आशय आणि भाषाशैली या दोन्ही दृष्टींनी डॉ. गिरीश बापट यांनी लिहिलेले हे पुस्तक उत्कृष्ट असेच आहे. 'हे प्रचीतीचे बोलिले' अशी डॉ. गिरीश बापट यांच्या लिखाणाची जातकुळी आहे. त्यांची भाषा प्रासादिक आणि मांडणी सूत्रबद्ध आहे. या मांडणीत कुठेही गूढतेचे वलय नाही हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य. डॉ. गिरीश बापट यांच्या गेल्या तीन तपांच्या चिंतनातून तयार झालेली ही तत्त्विक बैठक आहे; त्यांना झालेले शिक्षणविषयक प्रक्रियेचे हे दर्शन आहे. हे पुस्तक म्हणजे केवळ ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यक्रमांचे वर्णन नाही तर पुस्तकात विवेचन केलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी केल्यानंतर विकसित झालेल्या अनेक नवीन शैक्षणिक सिद्धांतांचे आणि संकल्पनांचे विश्लेषणही आहे. माझ्या मते शिक्षणशास्त्राला मिळालेली ही मोठी देणगीच आहे.

सर्व शिक्षक, शालाप्रमुख, पालक, संस्थाचालक, शैक्षणिक प्रशासक, धोरणकर्तेआणि शिक्षणशास्त्राचे अभ्यासक यांनी आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे. ते वाचल्यानंतर या पुस्तकातील संकल्पना, सिद्धांत आणि कार्यक्रम यांचे यथार्थ आकलन व्हावे यासाठी त्यांच्याबद्दल गटांमध्ये अभ्यासपूर्वक चर्चा आयोजित करणे खूपच उपयोगाचे ठरेल. या प्रयोगांची अंमलबजावणी करण्यासाठी काय करता येईल याचा विचार करून पावले उचलणे ही पुढची पायरी. सर्व शाळांना, मग त्या कोणत्याही शिक्षण मंडळाशी संलग्न असोत, कोणत्याही माध्यमाच्या असोत किंवा अनुदानित अथवा विनाअनुदानित असोत, या कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे शक्य आहे. ज्ञान प्रबोधिनी अंमलात आणत असलेल्या प्रयोगांचे अनुसरण करत असणाऱ्या काही माध्यमिक शाळा मला माहीत आहेत. मी ज्या शाळेत शिकलो त्या शाळेतही काही शिक्षक अशाच प्रकारचे अनुभव आम्हां विद्यार्थ्यांना देत होते असे आता लक्षात येते. बरेच अनुभव विद्यार्थी शाळेबाहेर, त्यांच्या घरात, किंवा पालकांना आणि शेजाऱ्यांना मदत करताना घेत होते. त्यामुळेच प्रतिकूल पार्श्वभूमी असूनही विद्यार्थ्यांच्या म्हणण्याला कान आणि वेळ दोन्ही देणारे परंतु प्रयत्न मात्र विद्यार्थ्यांचेच असतील अशा वृत्तीने काम करणारे शिक्षक लाभल्यामुळेच माझ्या शाळेत शिकलेले अनेक विद्यार्थी कोणत्याही संघटनेशी बांधलेले नसतानाही समाजाभिमुख वृत्तीने काम करत होते आणि करत आहेत. उज्ज्वल भवितव्यासाठी निष्क्रियतेकडून सक्रियतेकडे वाटचाल करण्याशिवाय देशाला भवितव्य नाही आणि त्यासाठी शिक्षण हाच सर्वोत्तम मार्ग आहे.

(मनुष्य घडणीसाठी आवाहन खंड १ व २ यांची प्रस्तावना)

- डॉ. वसंत काळपांडे,

३ आनंदवन सोसायटी,
गांधी भवनाजवळ, कोथरूड, पुणे ४११०३८

| लेखाचे शिर्षक | लेखकाचे नाव | वर्ष | - | अंक |
| --- | --- | --- | --- | --- |
| १. प्रतिभाशाली विचार | वाच.वनिता पटवर्धन | १ | – | १ |
| २. विद्याव्रती अध्यापक | प्रा. प्रशांत दिवेकर | १ | – | २ |
| ३. कार्यपत्रकाद्वारे अध्ययन – अध्यापन | प्रा. सुप्रिया दर्प | १ | – | २ |
| ४. इग्नाईट शिष्यवृत्ती परिचय | संकलन | १ | – | २ |
| ५. संग्रहालय : एक शिक्षण केंद्र | प्रा. प्रशांत दिवेकर | १ | – | ३ |
| ६. इतिहासाचे आरसे–नाणी | प्रा. अमोल बनकर | १ | – | ३ |
| ७. संग्रहालय सूची | संकलन | १ | – | ३ |
| ८. उपासना: पूर्णत्वाचे प्रकटन करणारी प्रक्रिया | प्रा. मुकुलिका थत्ते | १ | – | ३ |
| ९. आगगाडीच्या खिडकीतून | प्रा. मिलिंद चिंदरकर | १ | – | ४ |
| १०. जम्मत घर | प्रा. शिवराज पिंपुडे | १ | – | ४ |
| ११.ज्ञानरचनावाद | प्रा. प्रशांत दिवेकर | १ | – | ४ |
| १२. सॉक्रेटिसची प्रश्नपद्धती | प्रा. विवेक पोंक्षे | १ | – | ५ |
| १३.इतिहास पुस्तक तयार करताना | प्रा. राहुल कोकीळ | १ | – | ५ |
| १४.ज्ञानरचना कृती संशोधक | प्रा. सई ठाकूरदेसाई | १ | – | ५ |
| १५.ग्रंथालय: ज्ञानाचे सदावर्त | प्रा. माधुरी बारपुते | १ | – | ५ |
| १६.ग्रंथालयासाठी पुस्तक निवड | प्रा.शैलजा देशमुख | १ | – | ५ |
| १७. वाचकवीर पुस्तक यादी | संकलन | १ | – | ६ |
| १८.पुस्तक परिचय कसा करावा ? | संकलन | १ | – | ६ |
| १९.संशोधनात्मक प्रकल्प आणि रचनावाद | प्रा. नचिकेत नित्सुरे | १ | – | ६ |
| २०.ज्ञान रचनावाद : प्रकल्पवृत्ताचे विश्लेषण | प्रा. नचिकेत नित्सुरे | १ | – | ६ |
| २१. विज्ञानाची भाषा | प्रा. प्रशांत दिवेकर | १ | – | ७ |
| २२.सार्वत्रिक शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण | वाच. गिरीश बापट | १ | – | ७ |
| २३. विज्ञानाश्रमातील बौद्धिक क्षमतांचा विकास | डॉ.एस. एस. कलबाग | १ | – | ७ |
| २४.संकल्पना | संकलन | १ | – | ७ |
| २५.वर्षारंभ : वर्षाचा आरंभ उपासनेने करूया । | प्रा. यशवंत लेले | १ | – | ८ |
| २६. वर्षारंभ उपासना | संकलन | १ | – | ८ |
| २७. संकल्पना:यादी,आराखडा | संकलन | १ | – | ८ |
| २८. कार्यकेंद्रित शिक्षण | प्रा. ओंकार बाणाईत | १ | – | ९ |
| २९. माझा शिक्षण विचार: एक स्वमूल्यमापनाचे साधन | प्रा. प्रियव्रत देशपांडे | १ | – | ९ |
| ३०. माझा शिक्षण विचार | प्रा.संस्कृती बापट | १ | – | ९ |
| ३१.टिचिंग फिलोसॉफी स्टेटमेंट | श्री.ओम गोडबोले | १ | – | ९ |
| ३२.निबंध लेखनात सुधारणा कशा कराव्यात? | वाच.नलिनी गुजराथी | १ | – | १० |
| ३३.समाजदर्शन उपक्रम | प्रा.माधुरी कुलकर्णी | १ | – | १० |
| ३४.विविध प्रकारचे प्रश्न प्रकार–एक दृष्टिक्षेप | प्रा. विवेक पोंक्षे | १ | – | १० |
| ३५.चुकीच्या उत्तराला शाबासकी | मार्क एम.पायन अनुवाद: मीना कर्वे | १ | – | ११ |

# पुस्तक परिचय


| | |
|---|---|
| १.प्रतिभेच्याप्रांतातीलप्रवास | वाच.अशोकनिरफराके |
| २.कल्पकबनूया | वाच.अशोकनिरफराके |
| ३.व्यक्तिविकासासाठीविदयाव्रत | ज्ञानप्रबोधिनीप्रकाशन |
| ४.अज्ञातवासींचीबखर | विनीताऐनापुरे |
| ५.आमादरेशान्तिनिकेतन | शिवानी.अनु.आशासाठे |
| ६.रचनावादीशिक्षण | रमेशपानसे |
| ७.वाचूआनंदे (भाग१ते४) | माधुरीपुरंदरे |
| ८.शब्दगन्ध | प्रा.अविनाशबिनीवाले |
| ९.भाषाघडतांना | प्रा.अविनाशबिनीवाले |
| १०.आश्वासकपालकत्व | प्रा.महेंद्रसेठिया |
| ११.शिक्षण | स्वामीविवेकानंद |
| १२.आदर्शशिक्षण | स्वामीविवेकानंद |
| १३.लिहावेनेटके | माधुरीपुरंदरे |
| १४.डीस्कूलींगसोसायटी | इवनईलीच |
| १५.एकनाथजी (चरित्र) | विवेकानंदकेंद्रप्रकाशन |
| १६.सेवासाधना | विवेकानंदकेंद्रप्रकाशन |
| १७.कथाशिलास्मारकाची | विवेकानंदकेंद्रप्रकाशन |
| १८.एकनाथजींचीपत्रेभाग१ | विवेकानंदकेंद्रप्रकाशन |
| १९.एकनाथजींचीपत्रेभाग२ | विवेकानंदकेंद्रप्रकाशन |
















































**Everyone is a winner!**

# www.competeprabodhiniway.com

## An initiative by Jnana Prabodhini and Techlead Software Engineering Pvt Ltd

# Online Mock Tests Series

## Package for MAHA-TET
## (Maharashtra State Teachers Eligibility Test)

CPW aims to provide you sample question papers for TET examination through this online mock series. It provides you practical approach to check your preparation for TET examination. TET Mock tests included in this package are as per the latest pattern. Our expert faculty has taken immense efforts to provide you the best series for TET examination.

Jnana Prabodhini's ERC department has been conducting several workshops for TET. Now, CPW (ERC) has come up with these unique mock tests for TET.

☆ **Package Contents**

Number of Full Length Mocks: 3

Paper I - 3

Paper II - 3

**FEEDBACK for IMPROVEMENT**

**Ready made Performance Analysis**

Topic wise, Time wise, Round wise, Risk wise and Difficulty level wise !

**Availability & Registration:**

☆ Mock examination package will be activated as soon as you make payment. Username & Password will be sent to your registered e –mail address.
Package will remain active till the date of examination.

☆ You will also receive valuable suggestions from experts via emails

# Compete Prabodhini Way

**Jnana Prabodhini Educational Resource Center**

'Vinayak Bhavan', 514 Sadashiv Peth, Pune, Maharashtra, India, 411030.

Phone : 020-24207193/94 Mobile : 8888811661

Email : info@competeprabodhiniway.com

Connect Us: www.facebook.com/CompetePrabodhiniWay

# Website Links for Class 8: Science

1. Stars and our solar system.
www.youtube.com/watch?v=g0oIt8Q3hG8
www.youtube.com/watch?v=X9LKAnySua8
www.youtube.com/watch?v=fmxi3HvK2Js
www.youtube.com/watch?v=tmNXKqeUtJM&list=PLED25F943F8D6081C

2. Biological Diversity
www.youtube.com/watch?v=fmxi3HvK2Js
www.youtube.com/watch?v=PRbVISZ3Gc4
www.youtube.com/watch?v=homTUpQXWE0
www.youtube.com/watch?v=EPfzJ9qaPcw

3. Atmospheric Prssure
www.youtube.com/watch?v=xJHJsA7bYGc
www.youtube.com/watch?v=jmQ8FWnM0fA
www.youtube.com/watch?v=I0C4QR0OEH0
www.youtube.com/watch?v=FQT2E3DuEMY

4. Magnetism
www.youtube.com/watch?v=eYSG5aeTy-Y
www.youtube.com/watch?v=hFAOXdXZ5TM
www.youtube.com/watch?v=BqKeiiezqzc
www.youtube.com/watch?v=ak8Bh9Zka50

5. The Structure of an Atom
www.youtube.com/watch?v=TBrJt-5LHgQ
www.youtube.com/watch?v=IP57gEWcisY
www.youtube.com/watch?v=vIwJe6V1OMg

6. chemical reactions and their types
www.youtube.com/watch?v=6imVbqSDvuU
www.youtube.com/watch?v=tE4668aarck
www.youtube.com/watch?v=g-biRwAVTV8

**ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र**

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
✆ २४२०७१९३, २४२०७१९४
E-mail: erc@jnanaprabodhini.org
**Visit us at: www.erc-pune.org**